प्रकरण पहिले

# प्रवासवर्णन तात्विक चर्चा आणि परामर्श



प्रकरण पहिले

# प्रवासवर्णन तात्विक चर्चा आणि परामर्श

## अ) ललितगद्य वाङमय प्रकार : स्वरुप व विकास

गद्यवाङमयाचे कथा, कादंबरी, नाटक, निबंध असे विविध वाङमय प्रकार आहेत. त्यापैकी एक नवीन वाङमय प्रकार म्हणजे ललित गद्य होय. १९२५–२६ च्या दरम्यान वि. स. खांडेकर आणि ना. सी. फडके यांनी इंग्रजीतील Personal essay या वाङमय प्रकारावरुन मराठीत ललितनिबंध, हा आत्मनिष्ठ निबंध प्रकार रुढ केला. एवढेच नव्हे तर या वाङमय प्रकाराची तात्विक चर्चा ही केली. ना. सी. फडके यांनी त्याला हितगुज, गुजगोष्टी असे नाव दिले, तर वि. स. खांडेकर यांनी लघुनिबंध असे नाव दिले. या संदर्भात वि. स. खांडेकर यांनी म्हटले आहे, "विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात गार्डिनर (आल्फा ऑफ धी प्लाऊ) सारख्या नवीन पद्धतीने निबंध लिहिणाऱ्या इंग्रजी लेखकांचा झालेला समावेश मराठी लेखकवर्गाला तत्पूर्वी परिचित असलेल्या इंग्रजी निबंधांहून गार्डिनरचे निबंध सर्वस्वी भिन्न होते. नव्या निबंधकाराला कुठलाही विषय चालतो – टोपी ठेवायला एखादी खुंटी लागते त्याप्रमाणे आपले व्यक्तित्व प्रकट करण्याकरिता निबंधकाराला कुठला तरी विषय घ्यावा लागतो इतकेच त्याचे महत्व असते हे गार्डिनर व त्याचाच जोडीचे आणि तोडीचे ल्यूकास्, लिंड वगैरे अन्य निबंधकार यांच्यावरुन सहज दिसून येण्याजोगे होते."[१]

हा वाङमय प्रकार इंग्रजीतून मराठीत आला असला तरी फ्रेंच मधील 'एसाय्' चा लेखक 'मॉटेन' यांच्या निबंध लेखनावरुन तो इंग्रजीत आला. वैचारिक निबंधापेक्षा त्याचा निबंध वेगळा असायचा. त्यामूळे दैनंदिन जीवनातील एखाद्या अनुभवावर आत्मानिष्ठ भूमिकेतून मुक्तपणाने त्यांनी लेखन केले. त्यामुळे त्यांच्या निबंधाचे स्वरुप पारंपारीक निबंधापेक्षा वेगळे ठरले. या वेगळेपणाचे वैशिष्ट्य म्हणजे हा निबंध वैचारिक असण्यापेक्षा भावनिक स्वरुपाचा असायचा, वस्तुनिष्ठ असण्यापेक्षा आत्मनिष्ठ असायचा त्यातील विचार, भावना, कल्पना या लेखकाच्या प्रवृत्तीशी निगडीत असायच्या या संदर्भात मॉटेनने काढलेले उद्‌गार महत्वाचे आहेत. तो म्हणायचा "I am myself the subject of my book" (माझ्या लेखनाचा विषय मीच आहे).

लघुनिबंधाचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्या लेखनातील 'मी' होय. लघुनिबंधात थेट लेखक 'मी' असतो. इंग्रजीतील सुप्रसिध्द लेखक 'जॉन्सन' यानेही लघुनिबंध म्हणजे 'मनाची स्वैर क्रिडा होय' (a loose sally of the mind) असे म्हटले आहे. दैनंदिन जीवनातील कोणताही हलकाफुलका विषय घेऊन लघुनिबंधकार लेखन करीत असतो. आणि हे लेखन आत्मनिष्ठ भूमिकेवरुन मोकळेपणाने केलेले असते. या संदर्भात ना. सी. फडके यांनी म्हंटले आहे. त्यानी म्हटले आहे. "लेखकाला सृष्टीतले सर्वच विषय प्रिय खरे, परंतू त्याचा सर्वात आवडता विषय कोणता? तर 'मी' या 'मी' बद्दल मनापासून लिहण्याची संधी मिळते. लघुनिबंधात, म्हणूनच मला लघुनिबंध लिहावेसे वाटतात".[२]

### १) गद्यवाङमयाचे प्रकार व लघुनिबंध :

मराठीमध्ये साधारणतः १९४५–५० पर्यत खांडेकर, फडके यांच्या पध्दतीने अनेकांनी लघुनिबंध लेखन केले. परंतू हा एक मुक्त वाङमय प्रकार असल्यामुळे प्रत्येक लेखकाने आपल्या प्रवृत्ती–प्रकृती नुसार लेखन करण्यास सुरुवात केली. त्याचा परिणाम असा झाला. की, लघुनिबंधाचेच स्वरुप बदलत गेले 'डॉ. चंद्रकांत वर्तक व डॉ. शरद राणे' यांनी म्हटल्या प्रमाणे "लेखनाचा विषय थेटपणे जर 'मी' च असेल तर त्या 'मी' ची जेवढी आणि जितकी रुपे असतील आणि होऊ शकतील तितक्यांवर आणि तेवढ्यांवर लिहिले गेले तर ते अगदी स्वाभाविक होय".[३] त्यामुळे लघुनिबंधाचे ललित निबंधात रुपांतर झाले. त्यांनी लघुनिबंध व ललितनिबंध यातील बदलाचे स्वरुप सांगताना म्हटले आहे." लघुनिबंध म्हणजे हलकाफुलका, गंमतजंमत करीत जाणारा, चमत्कृतिजन्य कल्पना मांडणारा असल्या कल्पनांना थारा न देणारा आणि तरीही 'माझा विषय मीच आहे' हे सूत्र न सोडणारा असा हा ललित निबंध होता. नाजूक–तरल संवेदना, सूक्ष्म व उत्कट भावना, तर्कशुध्द आणि तत्वजिज्ञासू विचार, तीव्र भावानुभव, निसर्गाची बदलती रुपे, ऋतूंचा लावण्यमहोत्सव टिपताटिपतानाच त्यामागे असलेले शास्त्रज्ञाचे डोळस कुतूहल, काव्यात्मक प्रतिभा, रुपरसरंगगंधांचे उत्कट भान या कुणाच्याही व्यक्तिमत्वाला समृध्द करणाऱ्या वैशिष्ट्यांनी हा ललित निबंध पुरेपूर भरलेला आहे. त्याला कुठला विषय पारखा वाटतच नाही. उत्खननापासून वास्तुपुरुषापर्यंत सगळे सगळे विषय त्याचे–त्याचेच असतात."[४]

लघुनिबंधाचे ललितनिबंधात रुपांतर होताना ललितनिबंधाचे स्वरुप काही वेळेला कथेसारखे काही वेळा व्यक्तीचित्रणासारखे, काही वेळेला आत्मकथनासारखे, काही वेळेला काव्यात्मक बनू लागले. लघुनिबंधाप्रमाणे ललितनिबंधाने आपल्या सीमारेषा ओलांडल्या आणि त्याने इतर वाङमय प्रकारांना स्पर्श करण्यास सुरुवात केली. मात्र त्या सर्वच लेखन प्रकारांच्या केंद्रस्थानी लेखकामधला 'मी' राहिला. त्यामुळे अशा लेखनाचे वेगवेगळे प्रकार जाणवले तरी त्याची मूळप्रवृत्ती सारखीच राहिली आहे. ललितनिबंधाच्या या विकास क्रमात कालांतराने प्रवासवर्णनाचा समावेश करण्यात येऊ लागला. कारण प्रवासवर्णनात प्रवास करणाऱ्या लेखकातील 'मी' केंद्रस्थानी असतो. प्रवासातील अनुभवाच्या निमित्ताने तो आपले विचार, भावना, कल्पना यांची मुक्त अभिव्यक्ती करतो. ललितनिबंधाची आणि प्रवासवर्णनाची प्रकृती बरीचशी समान असल्याने ललित निबंधाचा एक उपप्रकार म्हणून प्रवासवर्णनाचा विचार करण्यास हरकत नसावी. अर्थात प्रवासवर्णन या लेखन प्रकाराची स्वतःची काही स्वतंत्र वैशिष्ट्ये आहेत. त्याचा विचार नंतर करण्यात येईलच. परंतू लघुनिबंधाच्या विकासातून प्रवास वर्णन हा एक वाङमय प्रकार निमार्ण झाल्याने त्याचा अंतर्भाव ललितनिबंधात करावा लागतो. अलिकडे अशा प्रकारच्या सर्वच वाङमय प्रकारांना ललितगद्य अशी संज्ञा वापरली जाते. म्हणून प्रवासवर्णन हा ललितगद्याचा एक प्रकार आहे. असे म्हणावसे वाटते.

## २) ललितगद्य व प्रवासवर्णन यांचा संबंध

ललितगद्य हा वाङमय प्रकार वेगवेगळ्या अंगाने विकसित झाला आणि त्यातूनच लघुनिबंध, व्यक्तिचित्रे, आत्मकथनात्मक निबंध, प्रवासवर्णन, स्थळवर्णन यासारखे प्रकार विकसित झाले. हे प्रकार भिन्न–भिन्न विषयावरचे असले, भिन्न–भिन्न स्वरुपाचे असले तरी त्यांच्या केंद्रस्थानी त्यांचे लेखन करणाऱ्या लेखकामधला 'मी' असल्याने त्यांना ललितगद्याचे स्वरुप प्राप्त झाले. प्रवासवर्णनात लेखकामधला 'मी' जर केंद्रस्थानी असेल तर त्याचे लेखन आत्मनिष्ठ स्वरुपाचे ठरत असल्याने या वाङमय प्रकारात मोडते. जो लेखक प्रवासातील माहितीची नोंद करतो. ज्या स्थळांना भेटी दिल्या त्या सगळ्याची वर्णने करतो. त्याचे लेखन हे वस्तुनिष्ठ स्वरुपाचे ठरत असल्याने त्याचा साहित्यात समावेश करण्याची गरज नाही. कारण साहित्यात लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा आविष्कार होणे आवश्यक असते. ज्या लेखनात लेखकाची आत्मनिष्ठता आढळते. तेच लेखन साहित्यरुप

होते. ज्या प्रवासवर्णनात अशा प्रकारे लेखकाच्या आत्मनिष्ठतेचा व्यक्तित्वाचा आविष्कार झाला असेल आणि तो ही कलात्मक रीतीने, तरच त्याला आपण ललित वाङमयाचे स्वरुप म्हणू शकतो. अनेकांनी प्रवासवर्णने लिहिलेली असली तरी ती ललितगद्यात येऊ शकत नाहीत. कारण त्यातून लेखकांतील 'मी' चा अविष्कार झाला असेलच असे नाही. ज्याच्या लेखनामध्ये 'मी' चा आविष्कार झाला असेल त्याच्याच प्रवासवर्णन लेखनाला ललित वाङमयाचे स्वरुप प्राप्त होते. म्हणून ललित गद्याचे स्वरुप स्पष्ट करताना डॉ. चंद्रकांत वर्तक, डॉ. शरद राणे या संपादकांनी म्हटले आहे, ''प्रवासवर्णनात प्रवासवर्णनकार येथून तेथून सर्वच 'मी' च असतो. या 'मी' चे स्वरुप आत्मचरित्रातील 'मी' प्रमाणे असते. आत्मचरित्रात 'मी' सर्वत्र असतो कारण त्या 'मी' ला त्याच्या स्वतःच्या आयुष्यातील घटनाप्रसंगांचे वस्तुस्थितीच्या पातळीवरुन कथन करायचे असते. तेथे कल्पिताला वाव नसतो. पण आत्मचरित्रकाराला हे प्रसंग स्वतःच्या मनासमोर, आयुष्याच्या उत्तर काळात म्हणजे आत्मचरित्राचे लेखन करताना आणावे लागतात. खरे म्हणजे मनाने जगावे लागतात. हीच प्रक्रिया प्रवासवर्णनाच्या लेखनाच्या प्रक्रियेत 'मी' ला 'मी' ने केलेला प्रवास, 'मनाने' पुन्हा एकदा प्रवास वर्णन लिहिताना अनुभवावा लागतो.'' [५] या विवेचनात संपादक व्दयांनी प्रवासवर्णनाचा ललितगद्याशी असणाऱ्या संबंधाचे सूत्र स्पष्ट केले आहे. लेखकामधील 'मी' चा आविष्कार करताना जे विविध वाङमय प्रकार निर्माण झाले. त्यापैकी एक वाङमय प्रकार म्हणजे 'प्रवासवर्णन' होय. प्रवासवर्णन म्हणजे केवळ स्थळांचे किंवा व्यक्तींचे चित्रण नव्हे, केवळ प्रसंगाचे चित्रण नव्हे, केवळ आत्मकथन नव्हे तर प्रवास करताना लेखकमधल्या 'मी' ने एका वैशिष्ट्य दृष्टीकोनातून प्रवासातील घेतलेल्या अनुभवाचे चित्रण होय. म्हणून प्रवासवर्णनात स्थळ, प्रसंग यापेक्षा त्यांच्या अनुभव घेणाऱ्या लेखकाचे मन त्या मनातून निर्माण झालेले भावनातरंग, विचारतरंग, कल्पनातरंग याचे चित्रण होय. म्हणूनच प्रवासवर्णनाचे स्वरुप हे लघुनिबंध, ललितनिबंध, व्यक्तीचित्रे यापेक्षा वेगळे ठरते. प्रवासवर्णन या वाङमय प्रकाराची स्वतःची म्हणून काही वैशिष्टे आहेत. त्याचा परामर्श खाली घेणार आहोतच. फक्त लघुनिबंधासारख्या एका वाङमय प्रकारातून प्रवासवर्णन या वाङमय प्रकाराचा जन्म कसा झाला हे स्पष्ट करण्यासाठी लघुनिबंध, ललितनिबंध या वाङमय प्रकाराची वरील भागात चर्चा केली आहे. संक्षिप्तपणे सांगायचे तर ललितनिबंधाच्या मुक्त वाङमय प्रकारातून 'प्रवासवर्णन' या एका वैशिष्ट्यपूर्ण वाङमय प्रकाराचा जन्म झाला. एवढे या ठिकाणी

नमूद करावेसे वाटते.

इतर कोणत्याही वाङ्मय प्रकारापेक्षा प्रवासवर्णनाचा ललितनिबंधाशी अधिक व जवळचा संबध आहे. ललितनिबंधाचा विषय अभिव्यक्तीची पध्दती ही प्रवासवर्णनापेक्षा भिन्न असते ही गोष्ट खरी परंतू त्यातील आत्माविष्कार, मनमोकळेपणा, लेखकाच्या व्यक्तिमत्वाची वैशिष्ट्ये आणि विशेषतः दोन्ही वाङ्मय प्रकारांच्या केंद्रस्थानी लेखकामधील असणारा 'मी' ही वैशिष्ट्ये दोन्ही वाङ्मय प्रकारात समान असतात. त्यादृष्टीने वा. ल. कुलकर्णी यांचे भाष्य अर्थपूर्ण वाटते. त्यांनी म्हटले आहे की...... ''प्रवासवर्णनात्मक लेखनाचे स्वरुप बऱ्याच वेळा लघुनिबंधलेखनासारखे भासते ते ह्यामुळेच. लघुनिबंधलेखनामागील अनौपचारिकता, स्वच्छंदपणे केलेले मुक्त–चिंतन, सिध्दांतनापेक्षा अनुभवकथनावर त्यात दिलेला भर, ह्या सर्वच गोष्टी आपणास काही प्रवासचित्रणात्मक लेखनांमधून आढळतात. लघुनिबंधलेखनातील तोच खेळकरपणा त्यात अवतरत असतो, एवढेच नव्हे, तर माहितीचा काटेकोरपणाही त्यामध्ये अपेक्षिलेला नसतो. ते लेखन स्वभावतःच Imperessionistic असते त्यात एक प्रकारची उत्स्फूर्तता असते. संस्कारांच्या अचूकपणापेक्षा त्यांच्या ताजेपणाला आणि टवटवीतपणाला येथे महत्व असते. एखाद्या प्रदेशाची, स्थळाची अधिकृत माहिती पुरविणे हा त्याचा उद्‌देशच नसतो आणि तशा प्रकारची त्याजकडून अपेक्षा करणेही वेडेपणाचे ठरते. एकप्रकाराच्या उत्साहाने, आत्माविष्काराच्या ओढीनेच ते केले जाते व म्हणूनच त्याचे स्वरुप ललितनिबंधात्मक बनते''.[६]

ललितनिबंधाप्रमाणे प्रवासवर्णन या वाङ्मय प्रकाराचा आत्मचरित्र या वाङ्मय प्रकाराशीही संबंध आहे. हे दोन्ही वाङ्मय प्रकार लेखकाच्या व्यक्तिमत्वावर आधारीत असतात. दोन्हीमध्ये जीवनात घडलेल्या प्रत्यक्ष अनुभवांची अभिव्यक्ती असते. अर्थात आत्मचरित्रामध्ये जीवनानुभवाला महत्व असते. तर प्रवासवर्णात बाह्यवातावरणातील जीवनानुभवाचे चित्रण असते. डॉ. वसंत सावंत यांच्या शब्दात ''प्रवासवर्णनामध्ये त्याच्या कर्त्याच्या प्रवासी जीवनाचे चित्र येते, तर आत्मचरित्रामध्ये त्याच्या कर्त्याच्या अखंड जीवनाचेच चित्र येते एका अर्थी, प्रवासवर्णनात 'प्रवासी–जीवन' येते, तर आत्मचरित्रात 'जीवनप्रवास' चित्रित होतो.''.[७] या संदर्भात डॉ. चंद्रकांत वर्तक, डॉ. शरद राणे या संपादकव्दयांनी प्रवासवर्णन व आत्मचरित्र यांचा संबंध स्पष्ट करताना म्हंटले आहे. ''आत्मचरित्रात आत्मचरित्रकाराला स्वतःच्या आयुष्यातील प्रसंगानुभवाचे कथन करावेच

लागते. तेथे कल्पिताला वाव नसतो. म्हणजे आत्मचरित्रात 'मी' सर्वत्र असतो. आणि त्या 'मी' चे कथन वस्तुस्थितीच्या पातळीवरुन होत असते. प्रवासवर्णनातही असेच असते म्हणून त्याची जवळीक आत्मचरित्राशी होते". [८] ललितनिबंधाच्या विकासक्रमात प्रवासवर्णनाला हळूहळू महत्व येत गेले आणि तो एक स्वतंत्र वाङमयप्रकार बनला आहे. प्रवासवर्णन या प्रकाराला स्वतःचा असा वाङमयीन घाट प्राप्त झाला आहे.

**ब) प्रवासवर्णन : एक वाङमय प्रकार :–**

**१) प्रवास : एक आदिम प्रवृत्ती**

प्रवास करणे ही मानवाची आदिम काळापासूनची एक मुलभूत प्रेरणा आहे. आदिम काळात बहुतेक सगळे मानव समुह सतत स्थलांतर करीत असल्याने ते प्रवासीच होते. पुढे कालांतराने एके ठिकाणी स्थिर होऊन त्यांनी गावे व नगरे वसवली आणि 'प्रवाशी' वृत्ती कमी झाली. तथापि राज्यकर्ते, सैनिक, व्यापारी लोक, धार्मिक लोक वेगवेगळ्या कारणांनी प्रवास करीत राहिले. परंतू प्रवासातील अनुभवाचे लेखन करावे ही प्रवृत्ती फारशी नव्हती. मात्र स्वातंत्र्योत्तर कालखंडात दळणवळणाची वाढलेली साधने, वाढलेले सांस्कृतिक व्यवहार यातून प्रवास करण्याच्या प्रवृत्तीला प्रेरणा मिळाली. विशेषतः प्रतिभाशक्ती प्राप्त झालेल्या आणि कथा, कादंबरी, नाटक या सारख्या ललित वाङमयाच्या विविध क्षेत्रात निर्मिती करणाऱ्या साहित्यिकांनी आपल्या प्रवासातील अनुभवांना कलात्मक रुप देण्याचा प्रयत्न केला आणि मराठीत प्रवासवर्णन या वाङमय प्रकाराची निर्मिती होऊ लागली. त्या वाङमय प्रकाराचा आता स्वतंत्र विचार करावयाचा आहे.

**२) प्रवासवर्णन : वाङमय प्रकाराची व्याख्या**

प्रवासवर्णन म्हणजे काय याचे वाङमयीन स्वरुप कसे असते याची शास्त्रीय मीमांसा मराठीत फारशी झालेली नाही. प्रवासवर्णनपर पुस्तकांना लिहिलेल्या प्रस्तावना, अशा पुस्तकांची केलेली परिक्षणे यातून प्रवासवर्णन या वाङमय प्रकाराबद्दल काही अंशाने स्फूट चर्चा झालेली आहे. प्रा. वा. ल. कुलकर्णी, प्रा. गंगाधर गाडगीळ, रा. भि. जोशी, रा. दा. जोशी, अ. ना. देशपांडे, काशिनाथ पोतदार, स. ग. मालशे, सुधीर रसाळ या समीक्षकांनी काही विचार मांडले आहेत. त्या दृष्टीने डॉ. वसंत सावंत यांचा 'प्रवासवर्णन : एक वाङमय प्रकार' हा प्रकाशित

झालेला प्रबंध मराठीत प्रवासवर्णनाचा विचार करणारा पहिला ग्रंथ ठरेल.

प्रवासवर्णन म्हणजे आपल्या नेहमीच्या परिचित प्रदेशापेक्षा एका वेगळ्या व नव्या प्रदेशात जाणिवपूर्वकतेने केलेला संचार होय. प्रवासवर्णन म्हणजे केवळ प्रवास नव्हे, त्या प्रवासाच्या पाठीमागे कोणतातरी हेतू असणे आवश्यक आहे. ट्रक ड्रायव्हर, बस ड्रायव्हर, भिकारी, व्यापारी, साधू–वैरागी हे वेगवेगळ्या प्रदेशात संचार करीत असले तरी त्याला 'प्रवास' असे म्हणता येणार नाही. 'प्रवास' हा सहजगत्या घडलेला नसावा. तर तो जाणीवपूर्वकतेने केलेला असावा. अशावेळी प्रवास करणाऱ्याची भूमिका 'प्रवाशी' ही असावी. अशा विशिष्ट हेतूने 'प्रवास' केला तर 'प्रवास' हा अनुभव ठरेल आणि त्या अनुभवनाने कथन हे प्रवासवर्णन ठरेल. इंग्लिश शब्दकोषात प्रवासवर्णनाला 'Travelogue' असा शब्द वापरला असून त्याचा अर्थ " A lecture or talk on travel, often illustrated pictorially" '९' म्हणजे वारंवार उदाहरणे देऊन किंवा आकृतीकाढून स्पष्ट केलेले प्रवासपर भाष्य होय. अर्थात प्रवासवर्णन हे मौखिक किंवा सचित्र असले पाहिजे असे नाही. ते लिखितही असू शकते म्हणून डॉ. वसंत सावंत यांनी केलेली व्याख्या बरीचशी अर्थपूर्ण आहे. त्याच्या मते, ''प्रवासवर्णन म्हणजे 'प्रवासात पाहिलेल्या किंवा घडलेल्या गोष्टींचा वृतान्त' त्याचा वृत्तांत दुसऱ्यांना सांगता येण्यासारखा असतो म्हणजे प्रवास हा प्रवाशाचा एकप्रकारे 'अनुभव' ठरतो आणि तो 'अनुभव' 'वर्णन' करण्यालायक अनुभव असतो.''१०' प्रवासवर्णनाचे स्पष्टीकरण करताना डॉ. अ. ना. देशपांडे यांनी मांडलेला विचारही महत्वाचा वाटतो. त्यांच्या स्पष्टीकरणातून प्रवासवर्णनाच्या पाठीशी असणारी प्रेरणा व प्रवासवर्णनाचे स्वरुप स्पष्ट होते. त्यांनी म्हटले आहे, ''मानवी मनाच्या एका स्वाभाविक प्रवृत्तींतून प्रवासवर्णनपर वाङमय जन्माला येत असते. आपण पाहिलेला नवा मुलुख, तेथील लोकाचार, तेथील निसर्ग, जातांयेतांना अनुभवविलेले सुखाचे व संकटांचे प्रसंग यांची माहिती दुसऱ्याला सांगण्याची जी स्वभावसहज उत्कट इच्छा मनुष्याच्या ठिकाणी असते तीच मुख्यतः प्रवासवर्णनपर वाङमयाच्या निर्मितीला प्रेरणा देते''. '११' परंतू या सर्वापेक्षा डॉ. चंद्रकांत वर्तक व डॉ. शरद राणे या संपादक व्दयांनी ललितगद्याच्या संदर्भात चर्चा करताना प्रवासवर्णनाची केलेली व्याख्या ही मराठीतील सर्वात आधुनिक परिपूर्ण व्याख्या आहे. असे म्हणण्यास प्रत्ययवया नसावा. त्यांनी म्हटले आहे.

''आपल्या स्वतःच्या शरीर–मनाने केलेल्या प्रवासाचा, प्रवासात घेतलेल्या–आलेल्या अनुभवांचा

आणि मनावर स्थळादी गोष्टींचा झालेल्या संस्कारांचा स्मृतिरुपाने केलेला जागर, घेतलेला पुनर्शोध, शब्दरुपात सजीव करणे म्हणजे प्रवासवर्णन होय". '१२'

या व्याख्येतून असे स्पष्ट होते की प्रवास करताना प्रवास करणारा लेखक हा शरीराने व मनाने प्रवासाच्या अनुभवाशी एकरुप झाला पाहिजे आणि त्या अनुभवाची त्याने शब्दरुपात अभिव्यक्ती केली पाहिजे.

### ३) प्रवासवर्णनाचे मुख्य घटक

प्रवासवर्णन या वाङमय प्रकाराचा विश्लेषणात्मक विचार करताना डॉ. वसंत सावंत यांनी प्रवासवर्णनाचे तीन मुलभूत घटक सांगितले आहेत. त्या संदर्भात ते म्हणतात, "प्रवासवर्णन मुलतः ज्या अनेक घटकांनी साकारते, त्यांपैकी पहिला आणि महत्वाचा घटक 'प्रवासी' हा आहे. दुसरा घटक 'प्रवास' आणि तिसरा घटक 'प्रदेश".'१३' याचा अर्थ त्यांच्या मते प्रवासवर्णन या वाङमय प्रकाराचा विचार करताना खालील तीन मुद्द्यांचा विचार करावा लागतो......

प्रवासी

प्रवास

प्रदेश

**'प्रवासी' महत्वाचा घटक :–**

प्रवासवर्णन हे जो 'प्रवासी' आहे त्याचे असते. प्रवासवर्णन करणारा लेखक याने स्वतः प्रवास केलेला असला पाहिजे. स्वतः प्रवास केल्या शिवाय त्याला प्रवासाचा अनुभव येणार नाही. तसेच प्रत्येक प्रवासी लेखकाचे व्यक्तिमत्व वेगवेगळ्या प्रकारचे असते. त्यामुळे एकाच प्रवाशाच्या अनुभवाची अभिव्यक्ती निरनिराळे प्रकारे होऊ शकते. अर्थात हा प्रवासी कलावंत असला पाहिजे. वर म्हटल्याप्रमाणे तो केवळ प्रवासी (उदरनिर्वाहासाठी भटकंती करणारा) असता कामा नये. तो कलावंत असला पाहिजे म्हणजे त्याच्या ठिकाणी 'प्रतिभाशक्ती' असली पाहिजे. या प्रतिभाशक्तीचे वर्णन करताना अभिनवगुप्ताने 'अपूर्ववस्तु–निर्माणिक्षमा प्रज्ञा' तर वांग्भट व हेमचंद्र यांनी 'नवनवोन्मेषशालिनी प्रज्ञा' असे वर्णन केले आहे. प्रवास करताना सर्वांना अनुभव येतात.

परंतू अनुभवातील सौंदर्यात्मकता जाणवते व ती तो व्यक्त करीत असतो, ते कलात्मक करता येईलच असे नाही. प्रवास करणाऱ्या ज्या व्यक्तीच्या ठिकाणी प्रतिभाशक्ती असते. त्यांनाच कलात्मक अनुभव येतो. त्यामुळे त्याच्या अभिव्यक्तीत कोणत्या तरी प्रकारची नवनिर्मिती असते. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर सामान्य प्रवाशाचा अनुभव 'वस्तुनिष्ठ' असतो. तर कलावंत प्रवाशाचा अनुभव 'आत्मनिष्ठ' असतो. त्यामुळेच त्याच्या प्रवासवर्णनाच्या अभिव्यक्तीला कलात्मकरुप प्राप्त होते. प्रवासवर्णन ही त्यामुळे एक नवनिर्मिती ठरते. म्हणून वा. ल. कुलकर्णी यांनी म्हटले आहे. ''चांगल्या प्रवासचित्रणात्मक लेखनात नुसते वर्णन व निवेदन कधीच नसते. ....तर त्यात एक प्रकारची नवनिर्मिती असते. ही निर्मिती अनुभवांची असते.'' '१४' या ठिकाणी वा. ल. कुलकर्णी यांनी प्रवासवर्णन करणाऱ्या लेखकांच्या ठिकाणी नवनिर्मिती करणारी प्रज्ञा म्हणजे प्रतिभा असते हे सांगितले आहे.

**प्रवास**

प्रवासवर्णनाचा दुसरा महत्वाचा घटक म्हणजे 'प्रवास' होय. प्रवासात लेखकाला विविध प्रकारचे चांगले–वाईट अनुभव येतात. त्या अनुभवांमूळे त्याच्या मनात काही वेळेला 'विचार' येतात तर काही वेळेला 'कल्पना' सुचतात. काही वेळेला 'भावना' उचंबळून येतात. प्रवास करताना लेखकाच्या ठायी एक विशिष्ट प्रकारची 'प्रवासीवृत्ती' असते. म्हणूनच प्रवास करताना लेखकाला येणारा अनुभव इतर सामन्य प्रवाशांपेक्षा वेगळा प्रकारचा असतो. हे अनुभव स्थळ, वेळ, व्यक्ती, प्रसंग अशा विविध घटकांशी निगडीत असले तरी लेखकाच्या मनात उमटलेले विचारतरंग, भावतरंग, कल्पनातरंग वेगवेगळे प्रकारचे असू शकतात. म्हणूनच त्याच्या प्रवासातील अनुभवाला कलात्मकता प्राप्त होते.

**प्रदेश**

प्रतिभाशक्ती प्राप्त झालेल्या कलावंताला प्रवास करताना येणारा अनुभव हे कोणत्यातरी विशिष्ट प्रदेशातील असतात. अर्थात प्रदेश म्हणजे केवळ स्थळ नव्हे म्हणून डॉ. वसंत सावंत यांनी म्हटले आहे. ''प्रदेश म्हटल्याबरोबर त्याचा भूगोल, इतिहास, धर्म, कला, तिथला निसर्ग, तिथले वातावरण व इतर गोचर व अगोचर होणाऱ्या गोष्टी, तसेच इतर त्या–त्या प्रदेशाची खास काही वैशिष्ट्ये यात अभिव्यक्त होऊ शकतात''. '१५' प्रवासवर्णन करणारा लेखक त्या प्रदेशाचे वस्तुनिष्ठ

चित्रण करताच पण त्याच बरोबर आपल्या वैयक्तिक दृष्टीकोनातून त्या वर्णनाला एक वेगळेपण प्राप्त करुन देतो. त्यामूळे त्या प्रदेशातील विविध घटकांना एक प्रकारची चैतन्यमयता, सुंदरता प्राप्त होते.

प्रवासवर्णनात 'प्रवासी' 'प्रवास' व 'प्रदेश' हे जे तीन मुख्य घटक आहेत. त्यातून प्रवासवर्णन ही सजीव कलाकृती निर्माण होते. प्रतिभाशाली 'प्रवासी' त्याने कलात्मक दृष्टीकोनातून घेतलेला प्रवासाचा अनुभव आणि कलात्मक दृष्टीकोनातून प्रदेशाचे केलेले वर्णन या सर्वातून प्रवासवर्णन ही एक नवनिर्मिती असलेली कलाकृती निर्माण होते. डॉ. वसंत सावंत यांच्या शब्दात सांगायचे तर "प्रवासी, प्रवास व प्रदेश या मुलभूत घटकतत्वांनीच मूळात प्रवासवर्णन साकारते". [१५] या विवेचनातून प्रवासवर्णनाचे नेमके स्वरुप आणि त्याचे वेगळेपण स्पष्ट होण्यास हरकत नाही.

मराठीमध्ये गेल्या दीडशे वर्षात शेकडोनी प्रवास वर्णनाची पुस्तके प्रकाशित झालेली असली तरी त्या सर्वांनाच वाङ्मय कलाकृती असे म्हणणे अवघड आहे. कारण त्यातील काही प्रवासवर्णनामध्ये वस्तुनिष्ठ स्वरुपाची माहिती आढळते परंतू स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये मात्र मराठीतील अनेक लेखकांनी वाङ्मयीन गुणांचा स्पर्श झालेली सुंदर प्रवासवर्णने लिहिली आहेत त्यांची दर्शन पुढे येईल.

### क) प्रवासवर्णनाच्या प्रेरणा

प्रवास करणे ही माणसाची एक मुलभूत प्रवृत्ती आहे. अर्थात हा प्रवास जाणूनबुजून केलेला म्हणजे 'प्रवासासाठी केलेला प्रवास' या स्वरुपाचा असावा. तरच प्रवास हा अनुभव होतो. प्रवासामुळे अनुभवाच्या कक्षा रुंदावतात या संदर्भात मराठीतील प्राचीन कवि मोरोपंतानी म्हटल्याप्रमाणे

**"केल्याने देशाटन पंडित मैत्री सभेत संचार ।**
**शास्त्रगंथविलोकन, मनुजा चातुर्य येतसे फार ।।"**

**अर्थ** : निरनिराळ्या देशांत प्रवास केल्याने, विव्दांनाशी मैत्री ठेवल्याने, सभेत बोलण्याने, शास्त्राचे व ग्रंथाचे अवलोकन केल्याने माणसाच्या अंगी फार चातुर्य येते.

असा प्रवास वेगवेगळ्या कारणांनी केला जातो. डॉ. वसंत सावंत यांनी या संदर्भात म्हटले आहे. "प्रवास हा खालील कारणाने, उद्देशाने केलेला दिसेल १) राजकारण, २) व्यापार, ३) तीर्थदर्शन, ४) विद्यार्जन, ५) रणयात्रा, ६) नवप्रदेश पाहणे, ७) आनंदाप्रित्यर्थ, ८) राजकुमारींचा

शोध घेणे, ९) हिरे, मोती, जडजवाहीर यांचा शोध घेणे, १०) धनलाभ, ११) लौकिक सृष्टीचे ज्ञान मिळविणे, १२) परदेश दौत्यकर्म, १३) दुष्काळ व रोगांच्या साथीमूळे १४) केवळ दैवयोगाने, १५) मनोरंजन, १६) नैसर्गिक आपत्तीमूळे, १७) मानवी मनाच्या मूलभूत प्रवृत्तीमुळे, १८) विव्दत्सभेत भाग घेण्यासाठी, १९) यज्ञयाग करुन राजाश्रय मिळवणे, २०) जिज्ञासेमुळे, २१) व्यवसायार्थ अशा अनेक कारणांनी व उद्देशांनी प्रवास घडल्याचे निदर्शनास येते.'' '१७'

वरील कारणे वेगवेगळ्या व्यक्तींच्या संदर्भात आहेत. प्रवास वर्णनाचे लेखन करणाऱ्या लेखकांबद्दल नाहीत. लेखक प्रवास का करतो, प्रवासलेखन का लिहितो, याची डॉ. वसंत सावंत यांनी मीमांसा केली असती तर बरे झाले असते. तथापि वर सांगितलेल्या कारणांमधील खालील कारणे पु. ल. देशपांडे यांच्या सारख्या लेखकाबद्दल आढळू शकतात. ती अशी.

१) तीर्थदर्शन

२) विद्यार्जन

३) नवप्रदेश पाहणे

४) आनंदाप्रित्यर्थ

५) लौकीक सृष्टीचे ज्ञान मिळविणे

६) मनोरंजन

७) मानवी मनाच्या मूलभूत प्रवृत्तीमुळे

८) विव्दत्सभेत भाग घेण्यासाठी

९) जिज्ञासेमुळे

## पु. ल. देशपांडे यांच्या प्रवासवर्णनपर लेखनाच्या प्रेरणा

### १) मानवी जीवन व स्वभावाचे चित्रण

पु. ल. देशपांडे यांना प्रवासापेक्षा माणसे अधिक आवडली प्रवासाच्या निमित्ताने भेटलेल्या विविध प्रकारच्या माणसांचे स्वभाव चित्रण करावे ही केवळ प्रवासवर्णन लेखनाच्याच पाठिशी असणारी प्रेरणा नसून त्यांच्या एकंदर लेखनाच्या पाठिशी असणारी प्रमुख प्रेरणा आहे. या संदर्भात 'अपूर्वाई व पूर्वरंग' मध्ये त्यांनी केलेली विधाने अर्थपूर्ण ठरतात.

१)'' मला पाह्याला आवडतात माणसे!.... माणसाने माणूस पाहावा! तरुण पाहावा, म्हातारा

पाहावा, सुरुप पाहावा, कुरुप पाहावा, पुष्कळदा वाटते की, जीवनाविषयीचे चिंतन माणसांच्या गर्दीत होते तसे एकान्तात होत नाही. परदेशाच्या प्रवासात मला सगळ्यांत अधिक ओढ होती ती तिकडची माणसे पाहण्याची, त्यांच्याशी बोलायची, " '१८'

"माणसा इतके खरोखरच पाहाण्यासारखे फार थोडे आहे!" '१९'

"माणसामाणसांतला जिव्हाळा यापलीकडे मी काहीच मागायला गेलो नव्हतो... मी पूर्वेची वारी केली ती जीवनांच्या वाटा निरनिराळ्या नादात चालणाऱ्या देशोदेशींच्या अनोळखी वारकऱ्यांना भेटावे म्हणून आणि आनंद हाच की माझिया जातीचे मला खूपखूप लोक भेटले." '२०'

वर म्हटल्याप्रमाणे विनोदाच्या माध्यमातून मानवी जीवनाचे व प्रवृत्तीचे चित्रण करावे ही त्यांच्या प्रवासवर्णनाच्या पाठिशी असणारी प्रमुख प्रेरणा आहे. "आयुष्यात प्रवासवर्णन आणि आत्मचरित्र लिहायचे नाही असा फार लहानपणीच संकल्प सोडला होता". '२१' असे त्यांनी अपूर्वाईच्या प्रस्तावनेत विनोदाने म्हटले असले तरी त्यांच्यातील लेखकाला प्रवासातील आलेले अनुभव लिहिल्याशिवाय स्वस्थ बसविलेले नाही. या संदर्भात प्रा. गंगाधर गाडगीळ यांनी एके ठिकाणी व्यक्त केलेले मनोगत महत्वाचे वाटते."१९५७-५८ साली रॉकफेलर फाउंडेशन तर्फे मिळालेल्या अभ्यासवृत्तीमूळे मला अनेक देशांत प्रवास करता आला. या प्रवासात मला जे विविध अनुभव आले ते व्यक्त करणे मला आवश्यक वाटते. (त्याला एक मानसशास्त्र दृष्ट्या गंमतीचे कारणे असे की ते व्यक्त केल्याशिवाय मला दुसरे काहीही लिहिताच येईना) परंतू प्रवासवर्णनाची रुढ पध्दती मी वरील कारणामूळे त्याज्य ठरविली होती. त्यामूळे त्या पुस्तकात एकत्रित केलेल्या स्पुट लेखनाच्याव्दारे मी ते अनुभव आणि विचार व्यक्त केले." '२२'

याचा अर्थ लेखक हा कलावंत असतो आणि कलावंताला आपल्याला आलेला अनुभवाची अभिव्यक्ती केल्याशिवाय स्वस्थ बसवत नाही. दुसऱ्या शब्दात आत्माविष्काराची प्रेरणा ही सुध्दा पु. ल. देशपांडे यांच्या प्रवासवर्णन लेखनापाठीशी असणारी एक प्रेरणा आहे. असे म्हणता येईल. या संदर्भात पु. ल. देशपांडे यांनी म्हटले आहे, "प्रवासवर्णने ही प्रतिबिंबे असतात. तसे पाहिले तर सारे ललित साहित्य जीवनाच्या प्रवासात वेगवेगळ्या वातावरणात वाढलेल्या संवेदनशील लेखकांच्या मनावर उमटणाऱ्या प्रतिबिंबातूनच जन्म घेत असते.'२३'

## २) विद्यार्जन व विद्वत्सभेत सहभाग

पु. ल. देशपांडे यांना प्रवासाचा जो योग आला तो, ते ज्या विभागात नोकरी करत असत त्या विभागाने त्यांना शिष्यवृत्ती देऊन अभ्यासासाठी परदेशी पाठविले. पुणे रेडिओ केंद्रावरुन ''ऑल इंडीया रेडिओ ड्रामाप्रोड्यूसर' या जागेवर १९५५ मध्ये त्यांची नेमणूक झाली. 'फार्म फोरम' या 'युनेस्को' प्रणित कार्यक्रमांची धुरा त्याच्याकडे होती, त्यामुळे 'मिडिया ऑफ मास एज्युकेशन' या विषयावर अभ्यास करण्यासाठी त्यांना युनेस्कोची शिष्यवृत्ती मिळाली. इंग्लंडच्या बी.बी.सी. च्या सहकार्याने अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी ते इंग्लंडला गेले. त्यातूनच 'अपूर्वाईची' निर्मिती झाली. त्यानंतर अखील भारतीय नभोवाणी केंद्रावर 'डेप्युटी चीफ ड्रामाप्रोड्यूसर' या पदावर त्यांची नेमणूक झाली. त्यांच्यातर्फे १९६२ साली त्यांना पुन्हा परदेशी पाठविण्यात आले. त्यावेळी त्यांनी जपान व चीनचा प्रवास केला. आणि त्यातून 'पूर्वरंग' या प्रवासवर्णनाची निर्मिती झाली.

## ३) आनंदाप्रित्यर्थ

पु. ल. देशपांडे 'माणसाळलेले' कलावंत आहेत. वेगवेगळ्या थरातील माणसांमध्ये मिसळावे त्यांच्या स्वभावातील लकबी पहाव्यात असे त्यांना नेहमीच वाटते. प्रवासवर्णनाची संधी मिळाल्यानंतर अभ्यासाबरोबरच 'आनंद' मिळावावा ही सुध्दा त्यांची भूमिका होती. म्हणून त्यांनी 'पूर्वरंग' या पुस्तकात म्हटले आहे. ''पंढरीच्या वारीला जाणाऱ्यांना पांडुरंगाच्या दर्शनापेक्षा जोडीच्या वारकऱ्यांचा सहवासाचा मोह अधिक असतो. म्हणून तर खरे वारकरी एकमेकांना उरापोटी भेटत शेकडो मैलांची वाट तुडवित जातात. नुसत्या विठ्ठलाचे दर्शन मोटारीतूनही जाऊन येऊन मिळते. पण मग ती वारी नव्हे.

मी पूर्वेची वारी केली ती जीवनाच्या वाटा निरनिराळ्या नादात चालणाऱ्या देशोदेशीच्या अनोळखी वारकऱ्यांना भेटावे म्हणून आणि आनंद हाच की माझिया जातीचे मला खूप खूप लोक भेटले. आता पूर्वेचा रंग अधिकच खुलल्यासारखा वाटतो. कारण त्यात माझे अंतरंग मिसळले आहे!'' [२४]
पु. लं. च्या या मनोगतात त्यांची प्रवासविषयक भूमिकाच स्पष्ट होते.

## ४) जिज्ञासेमुळे

वेगवेगळे प्रदेश पाहावे तेथील संस्कृती पाहावी असे पु. लं. ना नेहमी वाटत असे विशेषतः नाट्य, साहित्य, संगीत, कलांचा आविष्कार त्या त्या देशांत कसा होता. त्या त्या देशांची कला संस्कृती आणि आपली कला संस्कृती याच्यात कोणते साम्य भेद आहेत ते पाहावे ही एक जिज्ञासा त्यांच्या मनात होती. इतिहासाच्या आणि भूगोलाच्या पुस्तकांतून प्रदेशाबद्दल बरेचसी माहिती वाचल्यामुळे युरोपियन देशांबद्दल त्यांच्या मनात कुतूहल निर्माण झाले. विशेषतः पूर्वेकडचा जपान पाहायची प्रबळ इच्छा लहानपणीच त्यांच्या मनात निर्माण झाला होती. त्यांनी म्हटले आहे,''आयुष्यात दोन देशांची यात्रा घडावी हे मी बालपणापासूनच वदत आलो आहे. पश्चिमेला इंग्लंड आणि पूर्वेला जपान. माझ्या सुदैवाने दोन्ही यात्रा घडल्या'' '२५' ही जिज्ञासा निर्माण होण्याच्या पाठिमागे बालपणीचा एक अनुभव येतो. त्यांचे आजोबा मुंबईला एका जपानी व्यापारी कंपनीत नोकरीला होते. त्या कंपनीचे जपानी साहेब सहकुटुंब सहपरिवार माझ्या आजोळी वर्षातून एकदा येत तेंव्हा त्यांच्या बरोबर खाण्यापिण्याचा कार्यक्रम होत. त्यामूळे जपानबद्दल त्यांच्या मनात आकर्षण निर्माण झाले हे आकर्षण ही सुध्दा त्यांच्या लेखनाची एक प्रेरणा आहे.

## ड) मराठीतील प्रवासवर्णनपर साहित्याचा परामर्श

### प्राचीन कालखंडातील प्रवासवर्णने

मराठीमध्ये प्रवासवर्णनाचे लेखन इंग्रजकाळात सुरु झाले असले तरी त्यापूर्वी मराठीत प्रवासवर्णन आजिबात नव्हते असे म्हणता येणार नाही. महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर हे एका दृष्टीने साहित्यातील पहिले 'प्रवासी' होत. त्यांनी महाराष्ट्र, आंध्र, गुजराथ, या भागात प्रवास केला. माहिमभट्टाने लिहिलेल्या लीळा चरित्रातून प्रवासवर्णनाच्या प्रारंभिक पाऊलखुणा दिसून येतात. नागदेवचार्य यांच्या 'चरित्र स्मृतिस्थळ' या ग्रंथात ह्या पाऊलखुणा दिसतात. रवळोव्यासांचे 'सह्याद्रीवर्णन' आणि नारोव्यास यांचे 'ऋध्दिपूरवर्णन' या दोन्ही ग्रंथात प्रवासवर्णने आली आहेत. महानुभव पंथीयांचे वाङमय वाचत असताना आपल्याला अनेक ठिकाणांची प्रवासवर्णने आढळतात. म्हणून असे म्हणण्यास हरकत नसावी की, मराठी साहित्यात प्रवासवर्णनांचा पाया महानुभवपंथानी घातला. अर्थात आजच्या प्रवासवर्णनाची सर्व तत्वे त्यात नसतील. महानुभवपंथीय प्रमाणे वारकरी संप्रदायातील संतांच्या काव्यामध्ये प्रवासवर्णने आढळतात. नामदेव, ज्ञानदेवानी केलेल्या तीर्थ यात्रा

आणि त्या अनुभवांतून केलेली अभंगरचना प्रवासवर्णनाच्या दृष्टीने अर्थपूर्ण आहेत. त्यादृष्टीने नामदेवाच्या अभंगातील 'तिर्थावळीचे अभंग' महत्वपूर्ण ठरतात. संत रामदासांच्या काव्यांमधूनही त्यांचे प्रवास विषयक अनुभव व्यक्त झाले आहेत. पंडित कवींमधील वामन पंडित, मुकूंद निरंजन–माधव यांच्या काव्यलेखनातूनही प्रवासाचे काही अनुभव व्यक्त झाले आहेत. शाहीर कवी कार्यक्रमासाठी अनेक गावे भटकत असल्याने त्यांनी अनेक स्थळ वर्णने केली आहेत. प्राचीन मराठी वाङ्मयाचे एक अभ्यासक श्री. ज. र. आजगावकर यांनी म्हंटल्याप्रमाणे "ज्ञानेदव, नामदेव, मुक्तेश्वर, रामदास, जयराम, रंगनाथ, वामन, मोरोपंत, एकनाथ, कृष्णदयार्णव, सोहिरोबा, देवनाथ व आवचितसुत, काशी, या कवींनी बहुतेक सगळा हिंदुस्थान पाहिला होता, हे त्यांच्याच ग्रंथांवरुन उघड होत आहे. ज्ञानदेव व नामदेव हे तीर्थयात्रेस गेले होते व त्या तीर्थयात्रेचे वर्णन नामदेवाच्या तीर्थावळीवरील अभंगात दिले आहेत. मुक्तेश्वराने इंग्रज लोकांचे वर्णन आपल्या ग्रंथात दिले आहे, यावरुन निदान सुरतेपर्यंत तरी त्याने प्रवास केला होता हे उघड होत आहे. जयराम व रंगनाथ हे तर हिमालयावरही जाऊन आले होते. वामन, मोरोपंत, कृष्णदयार्णव व एकनाथ हे काशीस गेले होते. यांपैकी कृष्णदयार्णव कवीने तर इतके दिवस प्रवास केला होता की, तो प्रवास संपवून तो महाराष्ट्रात आला, त्यावेळी राज्यक्रांतीमुळे महाराष्ट्राची स्थिती अगदी पालटून गेलेली त्याच्या दृष्टीस पडली व तशा प्रकारचे उद्‌गार त्याने आपल्या ग्रंथात काढले आहेत. सोहिरोबा राहणारे कोकणचे व देवनाथ वऱ्हाडात राहात होते. पण ते दोघेही ग्वाल्हेर येथे समाधिस्थ झाले, हे प्रसिध्दच आहे. अवचितसुत काशी कवी तर 'दिल्लींद्राच्या बंधनापाशी' आपण सापडलो होतो हे स्वतःच आपल्या ग्रंथात सांगत आहेत. निरंजन माधव कवी तर पक्का राजकारणी असून त्याने कर्नाटकात प्रवास केला होता, हे त्याच्याच ग्रंथावरुन सिध्द होत आहे. रामजोशीबुवांनी संस्कृताचे अध्ययन केले ते कर्नाटकात केले त्यास पाचसहा भाषा उत्तमप्रकारे येत होत्या. एकंदरीत तात्पर्य काय की, जुने मराठी कवी चांगले विव्दान, व्यवहाचतुर, सदाचारी, प्रेमळ आणि हरिभक्त होते. व इतक्या सर्व गुणांचा त्यांच्या काव्यांत ठिकठिकाणी ठसा उमटल्यामुळे ते काव्य सहजच निसर्गमनोहर उतरले आहे. शिवाय त्यांचा अधिकार फार मोठा होता." [२६]

अर्थात त्यांच्या लेखनातील अभिव्यक्तीच्या पाठीशी प्रवासवर्णन ही प्रेरणा नव्हती. स्थळ महात्म्य सांगावे, स्थळाशी निगडीत गोष्टी सांगाव्यात, तेथील व्यक्ती आणि देवदेवता यांची माहिती

सांगावी, भक्ती वाढवावी हाच हेतू त्यापाठीमागे होता. कारण साहित्याकडे ते भक्तीचे व धर्माचे एक साधन म्हणून पाहात होते. आजच्या प्रवासवर्णनाच्या कसोट्या त्यांच्या साहित्याला लावता येत नसल्या तरी त्यांचे महत्व कमी होत नाही.

**आधुनिक काळातील प्रवासवर्णने**

एक वाङमय प्रकार म्हणून प्रवास लेखनाची सुरुवात आंग्लकाळात सुरु झाली. इंग्रजी भाषा व साहित्य यांचा परिचय, मुद्रकलेचा शोध, छापील ग्रंथनिर्मितीची सुरुवात यामुळे प्रवासवर्णन लेखनाला प्रारंभ झाला. १८४९ मध्ये महादेव गोविंदशास्त्री कोल्हटकर यांनी 'कोलंबसचा वृत्तांत' लिहिला परंतू अस्सल आणि सच्चे प्रवासवर्णन म्हणजे गोडसे भडजींचे 'माझा प्रवास' हे पुस्तक होय. १८८७ मध्ये त्यांनी ते लिहिले आणि १९०७ मध्ये प्रसिध्द झाले. १८५७ च्या बंडात वणवणताना झांशीच्या युध्दात आणि नंतरच्या विजनवासात मृत्यूने केलेल्या पाठपुराव्याचा जो भयानक अनुभव त्यांना आला, त्याची पुनर्निमिती या वर्णनात केलेली आहे. बंडाचे सावट पुस्तकभर आहे. रावजी भवानराव पापगी यांचे विलायतच्या प्रवासाचे दोन भाग १८८९, १८९२ नरसिंह चिंतामण केळकरांची 'सिमलावर्णन' (१९२४) 'विलायत बातमीपत्रे' (१९२२) ही प्रवासवर्णने, गोविंद चिंतामणजी भाट्यांची 'माझी विलायतची यात्रा' (१९३४) अशा सारख्या प्रवासवर्णनाने मराठी प्रवासवर्णनांना खरीखुरी मराठी ललितगद्याची वाट खुली करुन दिली. त्यांनी जेम्स एगाटची दैनंदिनी पध्दत प्रवासवर्णनात लिहिताना स्वीकारली. लेखकाचे व्यक्तिमत्व, संस्कार, संवेदनशीलता, स्थळाविषयी व तेथील लोकांविषयीचे कुतूहल परिस्थितीचे मार्मिक आकलन, सहप्रवाशांचे चित्रण इत्यादी वैशिष्ट्यांनी त्यांची इतर प्रवासवर्णनेही संपन्न आणि समृध्द झाली आहेत.

मराठीत खऱ्या अर्थाने प्रवासवर्णनाची सुरुवात 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे' या अनंत काणेकरांनी केली. त्याच्यापूर्वीच्या लेखकांनी लिहलेल्या प्रवासवर्णनात प्रसंगाचा, स्थळांचा तपशील जास्त असे, लालित्य कमी असे, प्रवासातील आलेला अनुभवाचा कलात्मक अविष्कार प्रथमत अनंत काणेकरानीच केला. त्या संदर्भात प्रा. भीमराव कुलकर्णी यांनी केलेले भाष्य महत्वाचे वाटते त्यांनी म्हटले आहे. ''अलिकडे मराठीतील प्रवासवर्णनात्मक लेखन अधिकाधिक लालित्यपूर्ण रीतीने होत आहे. आपण केलेल्या प्रवासाची व पाहिलेल्या दृश्यांची जंत्री निव्वळ देणे, या जुन्या पध्दतील खो बसून लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा आविष्कार या वर्णनातून मोठ्या प्रमाणात होत आहे. या

प्रमुख श्रेय अर्थातच अनंत काणेकरांना द्यावे लागेल. 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे' या १९४३ साली प्रसिध्द झालेल्या त्यांच्या युरोप व रशियाच्या प्रवासवर्णनात्मक पुस्तकामुळे मराठीतील या प्रकारच्या लेखनाला एक प्रकारे कलाटणीच मिळाली. काणेकरांना प्रवासाचे, माणसांचे विलक्षण वेड, आणि म्हणूनच त्यांचे प्रवासवर्णनात्मक लेखन हे केवळ त्या त्या प्रसंगाचे व स्थळांचे रेखाटन अशा स्वरुपाचे राहात नाही. त्यांच्या साऱ्या लेखनामध्ये त्यांच्या व्यक्तित्वाचे रंग इतके बेमालूम मिसळून जातात की, त्यामुळे दैनंदिनीच्या पध्दतीने लिहिलेले हे प्रवासवर्णन एक नितान्तसुंदर गद्यकाव्य बनून जाते. त्यामध्ये जीवनाबध्दलचे उदंड कुतूहल आहे. आपल्या अनुभवांची कलात्मक परंतू सूचक, संयमित मांडणी करण्याची कुशलता आहे, अभिजात विनोदवृत्ती, आहे आणि थोडक्यात परंतु रेखीव शब्दचित्रे साकार करण्याचे लेखणीचे हुकमी सामर्थ्य आहे. प्रवासात आलेले किती तरी अगदी सामान्य वाटणारे अनुभव त्यांच्या लेखनपध्दतीमुळे मोठे बोलके आणि अर्थपूर्ण वाटू लागतात. त्यांच्या प्रवासवर्णनातून मिष्किल वृत्तीचे लघुनिबंधकार काणेकर जसे भेटतात तसेच चांदरातीची बरसात करणारे कवीही जाणवतात. सशाच्या कानाप्रमाणे सदैव टवकारलेली त्यांची प्रवृत्तीमयता तर क्षणोक्षणी नवनवा उन्मेष प्रकटविते. त्यांचा गोष्टीवेल्हाळपणा कुठेही पाल्हाळिक रुप धारण करीत नाही आणि उगाच भाबडेपणाने ते कुठे भारावून जाऊन लिहीत असताना दिसत नाहीत.'' '२७' त्यामुळे अनंत काणेकरांनी लिहिलेले ''धुक्यातून लाल ताऱ्याकडे'' (१९४३) या प्रवासवर्णन पुस्तकाचे मराठी साहित्यात मानाचे स्थान आहे. याच बरोबर त्यांनी ''आमची माती, आमचे आकाश'' 'निळे डोंगर, तांबडी माती' 'खडक कोरतात आकाश' अशी प्रवासवर्णने प्रकाशित केली. या साऱ्याच प्रवासवर्णनपर लेखनामध्ये त्यात प्रदेशाचे तेथील संस्कृतिचे जसे चित्रण आले आहे त्याच प्रमाणे श्री. अनंत काणेकर यांच्या वाङमयीन व्यक्तिमत्वाची वैशिष्ट्येही प्रकट झाली आहेत. म्हणूनच प्रा. भीमराव कुलकर्णी यांनी गौरवाने म्हटले आहे की, ''रुक्ष आणि रटाळ प्रवासवर्णनांच्या मार्गातून लालित्याच्या नितांतसुंदर प्रांगणात प्रवासवर्णनांना आणून सोडण्याचे सारे श्रेय काणेकरांचे. त्यांनी दाखविलेल्या मार्गाने प्रवासवर्णने कशी डौलदार आणि आकर्षक गतीनें चाललेली आहेत''. '२८'

काणेकरानंतर गो. नी. दांडेकर याचे 'नर्मदेच्या तटाकी' रा. भि. जोशी यांची 'वाटचाल' व 'मजल–दरमजल' ही पुस्तके, गंगाधर गाडगीळ यांची 'गोपुराच्या प्रदेशात', सातासमुद्रापलिकडे',

प्रभाकर पाध्ये यांची 'अगस्तीच्या अंगणात' 'तोकोनामा', जयवंत दळवी यांचे 'लोक आणि लौकिक', दि. बा. मोकाशी यांची 'पालखी', अशी विविध प्रवासवर्णनपर पुस्तके प्रकाशित झाली. स्वातंत्र्योत्तर कालखंडात दळणवळणाची वाढलेली साधने आणि वाढलेले संस्कृतिक व्यवहार यामूळे अनेकांनी प्रवासवर्णने लिहिली. परंतू त्यामध्ये वाङमयीन गुणांचा आविष्कार झालेली प्रवासवर्णने फार कमी आहेत.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात मराठीत ज्यांनी उत्कृष्ट प्रकारे प्रवासवर्णने लिहिली त्यात सुप्रसिध्द विनोदी लेखक पु. ल. देशपांडे यांच्या अपूर्वाई (१९६०), पूर्वरंग (१९६३) ही प्रवासवर्णने वैशिष्ट्यपूर्ण आहेत. याशिवाय 'वंगचित्रे' आणि 'जावे त्याच्या देशा' ही देखील प्रवासवर्णने लिहिली आहेत. या सर्वांमध्ये 'अपूर्वाई' व 'पूर्वरंग' या प्रवासवर्णनांना अधिक प्रसिध्दी मिळाली. रसिक व समीक्षक या दोघांनी या दोन्ही प्रवासवर्णनाचे मनःपूर्वक स्वागत केले. ही पुस्तके प्रवासवर्णनपर असली तरी केवळ तेवढे त्यांचे महत्व नाही. कारण प्रवासातील आपल्या अनुभवांचा पु. ल. देशपांडे यांनी विनोदी लेखनाच्या माध्यमातून जी अभिव्यक्ती केली आहे. त्यातून एका चिंतनशील व संपन्न व्यक्तीमत्वाचा आविष्कार झाला आहे. दोन भिन्न संस्कृतीतील साम्यभेदांचे त्यांनी या पुस्तकातून केलेले चित्रण वाचकांना हसविते पण त्याचबरोबर अंतर्मुखही करते. प्रा. भीमराव कुलकर्णी यांच्या शब्दात, " पश्चिमेकडच्या प्रवासाच्या निमित्ताने लिहिलेल्या 'अपूर्वाई' या पुस्तकापेक्षाही 'पूर्वरंग' विचारसंपन्न आहे आणि लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा यामध्ये अधिक चांगल्या रीतीने साक्षात्कार होतो. 'अपूर्वाई' मध्ये वैभव संपन्न असे पाश्चिमात्य जीवन पाहतानाची नवलाई होती, अप्रूप होती. पूर्वेकडच्या देशांच्या संदर्भात त्या नवलाईपेक्षा बरोबरीच्या नात्याची ऐट आहे, इथे विचारांचा मोकळेपणा भरपूर आहे. त्यामुळे लेखक काही वेळेला अतिशय परखड विचार बोलून दाखवितो, आणि त्यापाठिमागची तगमग वाचकांना विचार करावयास लावते". '२९'

### इ) पु. ल. व्यक्ती आणि वाङमय

पु. ल. देशपांडे हे एक मराठीतील एक श्रेष्ठ साहित्यिक आहेत. विनोदी लेखन, नाट्य, ललितगद्य या साहित्यक्षेत्रात त्यांनी जशी कामगिरी केली आहे. त्याचप्रमाणे मराठी रंगभूमीवर व चित्रपटसृष्टीत लेखक, नट, संगीतकार, पटकथा लेखक, दिग्दर्शक या भूमिकेतून ही कर्तृत्व दाखविले आहे. एका दृष्टीने ते अष्टपैलू कलावंत आहेत. त्यांचा जन्म दि. ८

नोव्हें १९१९ रोजी एका मध्यमवर्गीय कुटूंबात झाला. त्यांचे शिक्षण मुंबई, पुणे, सांगली येथे एम्. ए. एल. एल. बी. पर्यंत झाले. त्यांचे आजोबा वामन मंगेश दुभाषी हे स्वतः कवी आणि लेखक होते. त्यांच्या साहित्यप्रेमाचे, सहृदय विनोद पध्दतीचे संस्कार देशपांडे यांच्यावर बालपणापासून झाले. नटवर चिंतामण कोल्हटकर आणि प्रसिध्द हार्मोनियम पट्टू दत्तोपंत राजोपाध्ये यांच्यामुळे त्यांच्या मनात नाट्य व संगीत या कलेचे त्यांना आकर्षण निर्माण झाले. मुंबई येथे विलेपार्ले या उपनगरात राहात असताना तेथील टिळक मंदिरात साहित्य, संगीत, कलाविषय, कार्यक्रम केले जात. तेथील सांस्कृतिक वातावरणाचे देशपांडे यांच्यावर प्रभाव पडला.

शिक्षण समाप्तीनंतर माहिमच्या शाळेत शिक्षकाची नोकरी, बेळगावच्या राणी पार्वतीबाई कॉलेजात प्राध्यापक, मुंबईला बॉम्बे कॉलेजात (कीर्ति कॉलेज) प्राध्यापक, मालेगावातील महात्मागांधी मंदीर या शाळेच्या प्राचार्यपदी काही वर्षे, काही वर्षे त्यांनी कारकून, शिक्षक, प्राध्यापक अशा नोकऱ्या केल्या. नंतर मात्र 'आकाशवाणी' च्या मुंबई केंद्रावर मराठी नाट्यविभाग प्रमुख पुणे रेडिओ केंद्रावर 'फार्म फोरम' या युनेस्को प्रणीत कार्यक्रमाची धुरा, दिल्लीच्या दूरचित्रवाणीवर कार्यक्रमाचे निर्मति व आकाशवाणीवरील अखिल भारतीय नाट्य विनोदाचे प्रमुख म्हणून होते. या विविध नात्यांनी काम केले.

पु. ल. देशपांडे यांचे वाङ्मयीन कार्य :– इ. स. १९४३ च्या सुमारास "अभिरुची" या मासिकातून त्यांनी लेखनास सुरुवात केली. अन्य मराठी नियतकालीकातून त्यांचे लेखन प्रसिध्द होऊ लागले. पुढे त्यांनी नाट्यक्षेत्रात व चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. 'पुढचे पाऊल' 'गुळाचा गणपती' हे त्यांचे गाजलेले चित्रपट होत. 'तुका म्हणे आता' (१९४८) 'अमंलदार' (१९५२) 'तुझ आहे तुझ पाशी' (१९५७) 'भाग्यवान' (१९५३) 'सुंदर मी होणार' (१९५७) 'ती फुलराणी' ही त्यांनी लिहिलेली नाटके असून 'तुझ आहे तुझ पाशी' व 'ती फुलराणी' या नाटकामुळे त्यांना खूप प्रसिध्दी मिळाली. त्याची बरीचशी नाटके इंग्रजीवरुन रुपांतरीत केलेली आहेत. श्री. अ. र. कुलकर्णी आणि प्रा. गो. म. कुलकर्णी यांनी म्हटल्याप्रमाणे, "कथानकांची हाताळणी, त्याला स्वाभाविक मराठी रुप देण्याच्या दृष्टीने मूळ संवादात आणि अन्य संदर्भात केलेले मार्मिक बदल, मुळातील प्रसंगांना चढविलेला खास मराठी पेहराव ह्यांतून नाटककार म्हणून त्यांच्या स्वतंत्र प्रतिभेचा आणि शैलीचा प्रत्यय येतो. साधे, सुंदर, मार्मिक संवाद हे त्यांच्या नाट्यलेखनाचे वैशिष्ट्य

आहे." '३०' या शिवाय त्यांनी बऱ्याचशा एकांकिका ही लिहिल्या आहेत. तसेच 'व्यक्ति आणि वल्ली' (१९६२) 'गणगोत' (१९६६) 'गुण गाईन आवडी' (१९७५) ही त्यांची गाजलेली व्यक्तिचित्रे आहेत. त्या शिवाय 'खोगीरभरती' (१९४६) 'नस्ती उठाठेव' (१९५२) 'बटाट्याची चाळ'(१९५८) 'गोळा बेरीज' (१९६०) 'असा मी असामी'(१९६४) 'हसवणूक' (१९६८) हे त्यांच्या विनोदी लेखनांचे संग्रह आहेत. त्यांच्या या सर्वच लेखनातून त्यांनी मध्यमवर्गीय समाजाचे चित्रण विनोदाच्या माध्यमातून केले आहे.

'अपूर्वाई'(१९६०) 'पूर्वरंग'(१९६३)'जावे त्याच्या देशा'(१९७४) 'वंगचित्रे'(१९७४)ही त्यांची प्रवासवर्णने आहेत. यात 'अपूर्वाई' आणि 'पूर्वरंग' ही त्यांची प्रवासवर्णने खूप गाजली आहेत. त्यांच्या 'बटाट्याची चाळ' या पुस्तकाला महाराष्ट्र राज्य पुरस्कार आणि साहित्य अकादमीचे पुरस्कार मिळालेले आहेत.

पु. ल. देशपांडे यांनी साहित्य, नाट्य, चित्रपट क्षेत्रात विविध प्रकारचे लेखन केले असले तरी विनोद हा सर्व त्या लेखन प्रकाराचा विशेष आहे. अ. र. कुलकर्णी आणि गो. म. कुलकर्णी यांनी म्हटल्याप्रमाणे "मार्मिक, सूक्ष्म, चोखंदळ आणि प्रसन्न विनोद हे सामन्यतः त्यांच्या साऱ्याच लेखनाचे एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणून सांगता येईल. त्यांच्या वक्तृत्वातही हे गुण आढळून येतात. मराठीत श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांपासून प्रल्हाद केशव अत्र्यांपर्यंत चालत आलेली विनोदाची परंपरा देशपांड्यांनी पुढे नेली व ती अधिक तरल, अभिरुचिसंपन्न, कलात्मक व आधुनिक बनविली. उपहास–उपरोध, विसंगती, वक्रोकती, श्लेष आदींचा उपयोग ते सारख्याच कौशल्याने करीत असले, तरी त्यांच्या विनोदात मर्मघातक डंख नसतो, कारण मानवी जीवनातील त्रुटींप्रमाणेच त्यातील कारुण्याची ह्या विनोदाला जाण आहे. हास्याच्या कल्लोळात तो अश्रूंनाही हळुवार स्पर्श करतो. हासू–आसूंच्या ह्या हृदयंगम रसायनाने त्यांच्या विनोदाला श्रेष्ठ दर्जा प्राप्त करुन दिला आहे. त्यात संस्कृतिटीकेइतकीच संस्कृतिच्या जपणुकीची ओढ आहे. देशपांड्यांची विनोदी लेखनाची शैलीही चतुरस्त्र, बहुढंगी आहे. प्राचीन महानुभाव गद्यापासून मर्ढेकरी शब्दकळेपर्यंतचे सारे ढंग तिने सहजपणे आणि सुभगपणे आत्मसात केलेले आहेत". '३१'

पु. ल. देशपांडे यांच्या विविध कार्याचा गौरव करण्यासाठी भारत सरकारने १९६६ मध्ये 'पद्मश्री' पदवी दिली. १९६७ मध्ये त्यांना संगीत नाटक अकादमीचे पारितोषिक देण्यात आले.

१९६५ मध्ये नांदेड येथे भरलेल्या मराठी नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष होते. १९७४ मध्ये इचलकरंजी येथे झालेल्या सुवर्णमोहोत्सवी मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष पदाचा मान मिळाला.

अशा पु. लं. च्या 'अपूर्वाई' व 'पूर्वरंग' या दोन प्रवासवर्णनपर साहित्यकृती मराठीत खूप गाजलेल्या असल्यामुळे शोध प्रबंधासाठी निवडले आहेत.

## पु. ल. देशपांडे यांची प्रवासवर्णने

पु. ल. देशपांडे हे मराठीतील एक साहित्यिक असल्याने आणि केंद्रसरकारच्या अखिल भारतीय अकाशवाणी केंद्रावर अधिकारी असल्याने ती अभ्यासासाठी निवडली आहेत.

१) अपूर्वाई

२) पूर्वरंग

३) वंगचित्रे

४) 'जावे त्यांच्या देशा'

यातील 'अपूर्वाई व पूर्वरंग' ही त्यांची प्रारंभीची महत्वाची व गाजलेली प्रवासवर्णने असल्याने त्यांच्या प्रवासलेखनाची वैशिष्टे अभ्यासासाठी निवडले आहे.

## १) अपूर्वाई

'अपूर्वाई'मध्ये पश्चिमेकडील युरोपियन देशांचे प्रवासवर्णन आले आहे. इंग्लंड, फ्रान्स, जर्मन, स्कॉटलंड, कैरो इ. देशाची १९५८ साली त्यांनी हा प्रवास केला. विज्ञानामूळे ज्या देशामध्ये भौतिक समृध्दी निर्माण झाली आणि संपूर्ण मानवी जीवन बदलले असे हे देश पाहिले आणि दुसऱ्या महायुध्दानंतर ही सारी युरोपियन राष्ट्रे पुन्हा वैभवाने उभी राहिली. औद्योगिकीकरणामूळे त्या देशांच्या झपाट्याने विकास झाला. या वैज्ञानिक व औद्योगिक संस्कृती या प्रदेशातील समाजाची प्रवृत्ती बदलली त्या सर्वांचे त्यांनी या पुस्तकांत वर्णन केले आहे. हे लेखन 'किर्लोस्कर'चे संपादक 'मुकूंदराव किर्लोस्कर' यांनी मासिकातून प्रसिध्द केले. ते वर्णन वाचकांना आवडल्याने रा. ज. देशमुख आणि श्रीविद्या प्रकाशनाचे श्री. द. दि. कुलकर्णी यांनी पुस्तक रुपाने प्रसिध्द केले. १९६० ते १९९९ या एकोणचाळीस वर्षात या पुस्तकांच्या सोळा आवृत्या निघाल्या. यातच या पुस्तकाची वाचकप्रियता स्पष्ट होते.

## २) पूर्वरंग

१९६३ मध्ये 'पूर्वरंग' हे दुसरे प्रवासवर्णनपर पुस्तक प्रकाशित झाले. यामध्ये पूर्वेकडील मलाया, कोलंबो, सिलोन, सिंगापूर, इंडोनिशियाचे बालीबेट, जोग–जकार्त, सायाम, हॉगकॉग, जपान, चीन इ. देशांचा केलेला प्रवास लेखनबध्द झाला आहे. पूर्वेकडची ही संस्कृती पश्चिमेकडच्या संस्कृतीपेक्षा अगदी भिन्न आहे. या प्रदेशातील निसर्ग, मानववंश, भाषा, संस्कृती, कला या स्वतंत्र आणि वेगळ्या आहेत. मात्र भारतीय वंश आणि संस्कृती यांच्याशी या पूर्वेकडील देशाच्या संस्कृतीचे एक जवळचे आणि निकटचे संबंध आहेत. पाश्चात्य संस्कृतीशी भारतीय संस्कृतीचा कोणतेही संबंध नाहीत. त्यामुळे अपुर्वाईपेक्षा पूर्वरंगातील लेखनाचा रंग वेगळा आहे. याही पुस्तकाच्या १९६३ ते १९९८ या ३५ वर्षाच्या काळात ११ आवृत्त्या निघाल्या. यातून ही या लेखनाची वाचकप्रियता सिध्द होते. श्री विद्या प्रकाशनाने १९६३ मध्ये हे प्रवासवर्णन पुस्तकरुपाने प्रसिध्द केले.

या दोन्ही प्रवासवर्णनात प्रवासाचे वर्णन आहेच. परंतू ते वर्णन विनोदाच्या माध्यमातून केल्याने त्यांचे स्वरुप मराठी प्रवासवर्णनात्मक साहित्यात आगळेवेगळे आहे. विशेष म्हणजे प्रवासातील स्थळांचे, व्यक्तींचे, छायाचित्रे दोन्ही पुस्तकात छापले नाहीत. मात्र सुप्रसिध्द व्यंग चित्रकार शि. द. फडणीस यांनी काढलेली चित्रे ही कमालीची अर्थपूर्ण असून त्या चित्रांनी लेखनाची रंगत वाढविलेली आहे. मराठीतील एका श्रेष्ठ साहित्यिकांने विनोदाच्या माध्यमातून रंगविलेली ही प्रवासवर्णने म्हणजे मराठी साहित्याचा एक अनोळखी ठेवा असून आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीकोनातून त्यांच्या अंतरंगाचा शोध घेणे हे आनंददायक कार्य आहे.

## प्रकरण पहिले

## संदर्भ – सूची


१. वि. स. खांडेकर (संपा.), **पारिजात** प्रस्तावना प्रथमावृत्ती १९५२ कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. पृ. ८

२. ना. सी. फडके, **साहित्य आणि प्रेरणा** या नागपूर नभोवाणीवरुन ध्वनिक्षेपित झालेल्या भाषण मालिकेतील 'गुजगोष्टी' हे भाषण, **सत्यकथा** फेब्रु. १९६१ मध्ये मुद्रित.

३. वर्तक चंद्रकांत, राणे शरद, **ललितगद्य, वाङ्मयप्रकार : आकलन आणि रसास्वाद**. पृथमावृत्ती नाशिक १९९१, पृ. ४

४. तत्रैव पृ. ६

५. तत्रैव पृ. १८

६. वा. ल. कुलकर्णी , **वाटचाल** प्रस्तावना, पृथमावृत्ती मुंबई, १९६६. पृ. ४, ५.

७. वसंत सावंत, **प्रवासवर्णन : एक वाङ्मयप्रकार**, पृथमावृत्ती मुंबई, १९८७. पृ. १३१

८. चंद्रकांत वर्तक, शरद राणे, **ललितगद्य, वाङ्मयप्रकार : आस्वाद आणि रसास्वाद**. पृथमावृत्ती नाशिक, १९९१. पृ. ९.

९. **The shortre Oxford English Dictionary**, page 2236.

१०. वसंत सावंत, **प्रवासवर्णन : एक वाङ्मयप्रकार**, पृथमावृत्ती मुंबई, १९८७. पृ. १८

११. अ. ना. देशपांडे, **आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग २**, पुनर्मुद्रण पुणे, १९७९, पृ. ५९३.

१२. चंद्रकांत वर्तक, शरद राणे, **ललितगद्य वाङ्मयप्रकार : आकलन आणि रसास्वाद.** पृथमावृत्ती नाशिक, १९९१. पृ. १२

१३. तत्रैव पृ. २२.

१४. वा. ल. कुलकर्णी, **वाटचाल** प्रस्तावना, पृथमावृत्ती दु. आ. मुंबई, १९६६. पृ. २.

१५. वसंत सावंत, **प्रवासवर्णन : एक वाङ्मयप्रकार**, पृथमावृत्ती मुंबई, १९८७. पृ. ३०

१६. तत्रैव, पृ. ३४

१७. तत्रैव, पृ. ११

१८. पु. ल. देशपांडे, **अपूर्वाई**, आवृत्ती सोळावी पुणे, १९९९, पृ. १४०, १४१.

१९. तत्रैव, पृ. १४३.

२०. पु. ल. देशपांडे, **पूर्वरंग**, आवृत्ती अकरावी पुणे, १९९८, पृ. २८७

२१. पु. ल. देशपांडे, **अपूर्वाई**, प्रस्तावना आवृत्ती सोळावी पुणे, १९९९, .

२२. गंगाधर गाडगीळ, **सातासमुद्रापलीकडे**, प्रस्तावना आवृत्ती तिसरी पुणे १९७६, .

२३. देशपांडे पु. ल., **अपूर्वाई**, प्रस्तावना आवृत्ती सोळावी पुणे, १९९९,

२४. देशपांडे पु. ल., **पूर्वरंग**, आवृत्ती अकरावी पुणे, १९९८, पृ. २८६, २८७.

२५. तत्रैव, पृ. १७९.

२६. ज. र. आजगावकर, **महाराष्ट्र कविचरित्र भाग १**, प्रस्तावना, मुंबई १९०७. पृ. ११, १२.

२७. भीमराव कुलकर्णी, (संपा.) **प्रदक्षिणा खंड – १**, आवृत्ती सातवी कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, पृ. ३९१

२८. तत्रैव, पृ. ३९३.

२९. तत्रैव, पृ. ४०१, ४०२.

३०. अ. र. कुलकर्णी, गो. म. कुलकर्णी (संपा.), **मराठी विश्वकोश खंड ७** (ड्युइस बुर्क ते धरणगाव) महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृति मंडळ, मुंबई, पृ. ९३२.

३१. तत्रैव, पृ. ९३२.